जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे. १.
दिनांक :- २०.८.९१

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथ. विभाग)
जिल्हा परिषद,
पुणे

विषय :- सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस १०९१/(५६३८) प्राशि ३ दिनांक १६.८.९१ चे पत्र.

---

उपरोक्त विषया संबंधीचे आपल्या कार्यालयात पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करून खाली नमूद केलेल्या संस्थेला नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९१ पासून इयत्ता १ली ते सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याचा शर्तीवर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| पश्चिम महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी रविवार पेठ, पुणे. | कोंढवा बु॥ ता. हवेली | १ली ते ९१-९२ या शै. वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह. | उर्दू |

---

संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. वर्गातील विद्यार्थी संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापक
लेडी हलिमा बेगम उर्दू प्राथमिक शाळा
कोंढवा, पुणे- ४११०४८.

Scanned with OKEN Scanner

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

[१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी. ✓

[२] संस्थे विरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत. ✓

[३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळा किंवा एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही. ✓

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही. ✓

[५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे. ✓

[६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास ... करुन घ्यावा.]

[७] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवल्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सदर प्राथमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही दिनांक १५.१०.९१ पर्यंत पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल दिनांक ३०.१०.९१ पर्यंत या कार्यालयास पाठवावा. संस्थेने वरीलपैकी कोणतीही अट पालन करण्यास असमर्थता दर्शविली तर संस्थेला दिलेल्या परवानगीचा फेरविचार तात्काळ करावा व तसा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

[signature]

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

जिल्हा ---------------------- यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा. सचिव, पश्चिम महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी शिवाजीनगर
पुणे २ ---------------------------- यांना माहितीसाठी
अग्रेषित.